# मंत्रिमंडळ निर्णय
# ३० ऑक्टोबर २०१३
# (मंत्रिमंडळ बैठक क्र. १३५)

| क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | जळगाव शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात नवीन पदवी अभ्यासक्रमासाठी ५२ पदांना मान्यता | उच्च व तंत्रशिक्षण |
| २ | महावितरणच्या पायाभूत आराखडा योजनेच्या सुधारित खर्चास मान्यता | ऊर्जा |
| ३ | महाराष्ट्र सावकारी (नियमन) विधेयक २०१० मध्ये सुधारणा करण्यास मान्यता | सहकार |

## जळगाव शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात नवीन पदवी अभ्यासक्रमासाठी ५२ पदांना मान्यता

जळगाव येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात नव्याने सुरु करण्यात आलेल्या पदवी अभ्यासक्रमासाठी २२ शिक्षकीय आणि ३० शिक्षकेतर अशी ५२ पदे निर्माण करण्यास आज मान्यता देण्यात आली. यासाठी १ कोटी ९७ लाख रुपये वार्षिक खर्च येणार आहे.

उच्चस्तरीय सचिव समितीच्या १४ जून २०१३ रोजी झालेल्या बैठकीत या पदांना मान्यता देण्यात आली होती. या पदांव्यतिरिक्त प्रयोगशाळा परिचर म्हणून ८ व्यक्तींच्या सेवा बाह्य यंत्रणेमार्फत घेण्यात येतील. जळगाव येथील या महाविद्यालयाची स्थापना १९९६ साली झाली असून या महाविद्यालयात स्थापत्त्य अभियांत्रिकी पदवी आणि अणुविद्युत व दूरसंदेशवहन (डिजिटल सिस्टिम) (पदव्युत्तर) असे दोन अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत. त्यासाठी या पदांची निर्मिती करण्यात आली आहे.

-----०-----

ऊर्जा

## महावितरणच्या पायाभूत आराखडा योजनेच्या सुधारित खर्चास मान्यता

महावितरण कंपनीतर्फे राज्यात पायाभूत आराखडा (इन्फ्रा १) त्याचप्रमाणे स्वतंत्र गावठाण फिडर योजना राबविण्यात येते. या प्रकल्पांचा मूळ मंजूर खर्च ११,४९०.४६ कोटी रुपये इतका होता. त्यात २,३८४ कोटी रुपये वाढ झाली असून या वाढीव खर्चाच्या २० टक्के प्रमाणे ४७७ कोटी रुपये शासनाच्या भागभांडवलास मंजुरी देण्यात आली.

या प्रकल्पांचा आराखडा २००६-०७ मध्ये त्यावेळच्या कॉस्ट डाटानुसार तयार करण्यात आला होता. परंतु प्रत्यक्षात २००८ साली कामास सुरुवात झाली. त्यावेळच्या जागेच्या उपलब्धतेनुसार, तसेच उपकरणांच्या किंमतीमध्ये वाढ झाल्यामुळे मूळ मंजूर किंमत वाढून ती १३,८७४.४५ कोटी इतकी झाली. त्या अनुषंगाने ही मान्यता देण्यात आली आहे.

-----०-----

## महाराष्ट्र सावकारी (नियमन) विधेयक २०१० मध्ये सुधारणा करण्यास मान्यता

महाराष्ट्र सावकारी (नियमन) विधेयक २०१० मध्ये सुधारणा करण्यास आज मान्यता देण्यात आली. हे विधेयक वर्ष २०१० च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधीमंडळाची मान्यता घेऊन राष्ट्रपतींकडे मान्यतेसाठी पाठविले होते. या विधेयकात केंद्र शासनाने वेळोवेळी सुधारणा सुचविल्या होत्या.

केंद्र शासनाच्या ८ ऑगस्ट २०१३ च्या पत्रानुसार या विधेयकातील कलम २ (४) व २ (१३) मध्ये आवश्यक ती सुधारणा करून केंद्र शासनाची मान्यता मिळाल्यानंतर अध्यादेश जारी करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. या सुधारणेनुसार कलम २ (४) मध्ये उपकलम (ए) ते (जी) अंतर्गत बँकींगची व्याख्या अधिक स्पष्ट केली आहे. कलम २ (१३) च्या उपकलम (III) मध्ये “कंपनी” ची व्याख्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अधिनियम १९३४ च्या तरतुदीप्रमाणे अधिक स्पष्ट केली आहे. तसेच उपकलम (iv) (बी) मध्ये बॅकींग संस्थेच्या व्याख्येत केलेल्या वरील सुधारणेप्रमाणे “सावकार” या व्याख्येत बँकींग संस्थांचा समावेश न करण्याबाबत स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे. या प्रस्तावास केंद्र शासनाची मान्यता मिळाल्यानंतर सावकारी विधेयकाबाबतचा अध्यादेश राज्यात लागू करण्यात येईल.

-----०-----